नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २२/०२/२०२५ (शनिवार) सकाळ**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द ३ गुन्हे नोंद मौदा पोलीसांची कारवाई, ८६ लाख ४५ हजार रूपयांचा मुददेमाल जप्त

दिनांक २१/०२/२०२५ रोजी मौदा पोलीसांना गुप्त बातमीदारामार्फतीने माहीती मिळाली की पोलीस स्टेशन हद्‌दीत अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक होत आहे.त्या अनुषंगाने मौदा पोलीसांनी नाकाबंदी करून त्यांनी खालील प्रमाणे कारवाई करून ३ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**१.** मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी भंडारा ते नागपूर रोड मौजा वडोदा येथे नाकाबंदी केली असता, एक संशयीत ट्रक क्रमांक एम.एच. ४० बी.जी. ४९५५ ला थांबवुन वाहनाची पाहणी केली असता, सदर ट्रक मध्ये ०६ ब्रास रेती मिळून आली. ट्रक चालक कुणाल परसराम आंबीलकर, वय २६ वर्ष, रा.मोहगाव देवी, ता.मोहाडी, जि. भंडारा याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याचे कडे कोणताही परवाना नव्हता. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन १) ६ ब्रास रेती किंमती ३०,०००/— रूपये आणि २) ट्रक क्रमांक एम.एच. ४० बी.जी. ४९५५ किंमती २५,००,०००/— रूपये असा एकुण **२५,३०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.आरोपीविरूध्द** कलम ३०३ (२),भा.न्या.सा. ४८(७),४८(८),म.ज.म.स,१९६६,कलम ४,२१ खाण आणि खनिज अधि.१९५७ ,कलम ३ सार्वजनिक सं.नु.प्रति अधि.१९८४ अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे.

**२.** मौदा पोलीसांनी भंडारा ते नागपूर रोड (एन.एच ५३ मौदा येथे नाकाबंदी केली असता , एक संशयीत ट्रक क्रमांक एम.एच. ४० बी.जी. २१७२ ला थांबवुन वाहनाची पाहणी केली. सदर ट्रक मध्ये ०५ ब्रास रेती मिळून आली. ट्रक चालक सृत्तपिठ शालीकराम शामकुवर, वय ३५ वर्षे, रा.टेकेपार डोडमाझारी याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने त्याचे कडे

असलेला बनावट परवाना दाखवला. ट्रक मालकाबाबत विचारपुस केली असता त्याने अमित संजय गायधनी, रा.रोहा ता.मोहाडी जि.भंडारा असे सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन १) ५ ब्रास रेती किंमती २५,०००/— रूपये आणि २) ट्रक कमांक एमएच ४० बीजी २१७२ किंमती २०,००,०००/— रूपये आणि ३) एक ॲन्ड्रॉईड मोबाईल किंमती १०,०००/— रूपये असा **एकुण २०,३५,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे. चालक आणि मालक अरोपीतांविरूध्द** ३०३ (२), ३१८(४), ३४०(२), ३३६ (३), ४९, ३ (५), भा.न्या.सा. सहकलम ४८(७),४८(८),म.ज.म.स,१९६६,कलम ४,२१ खाण आणि खनिज अधि.१९५७, कलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान.प्रतिबंध अधि. १९८४ अन्वये गुन्हा नोंद आहे. दोन्ही आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.

३. मौदा पोलीसांनी जाखेगाव शिवार एम.एस.सी.बी.गोडाउन जवळ नाकाबंदी केली असता एक संशयीत ट्रक कमांक एम.एच ४९ बी.एम ६७८४ ला थांबवुन वाहनाची पाहणी केली असता सदर ट्रक मध्ये १० ब्रास रेती मिळून आली. ट्रक चालक मुकेश शिवकुमार शाहु, वय २५ वर्षे,रा.नागपूर आणि क्लिनर आरोपी क २.लख्खनभाई कालुभाई भरवाड, वय २१ वर्षे ,रा. हुडकेश्वर रोड, वदना, नागपूर हे मिळुन आले त्यांना परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याचे कडे परवाना नव्हता. ट्रक मालकाबाबत विचारपुस केली असता त्यांनी मालक आरोपी क. ३. विकमभाई खोडाभाई सातिया वय २४ वर्ष रा.हुडकेश्वर रोड नागपूर असे नाव सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन १) १० ब्रास रेती किंमती ५०,०००/— रूपये आणि २) ट्रक कमांक एम.एच. ४९ बी.एम ६७८४ किंमती ४०,००,०००/— रूपये आणि ३) २ ॲड्रॉईड मोबाईल किंमती ३०,०००/— रूपये असा एकुण **४०,८०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.आरोपीतांविरूध्द** ३०३ (२), ४९ भा.न्या.सा. सहकलम ४८(७),४८(८) म.ज.म.स,१९६६ कलम ४,२१ खाण आणि खनिज अधि.१९५७, कलम ३ सार्वजनिक सं.नु.प्रति अधि. १९८४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपी क १ आणि २ यांना अटक करण्यात आली आहे.

**एकुण ८६,४५,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.**

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर